सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९०००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(१)(३)/२०२३/तेवीस दिनांक : २३ ऑगस्ट, २०२३.

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :- महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२३**
पोलीस उपनिरीक्षक व राज्य कर निरीक्षक संवर्गांच्या सुधारित निकालाबाबत.
**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक ०१/२०२३

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शनिवार दिनांक ३० एप्रिल, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२३ करीता पोलीस उपनिरीक्षक व राज्य कर निरीक्षक संवर्गासाठी विकल्प दिलेल्या उमेदवारांमधून पोलीस उपनिरीक्षक व राज्य कर निरीक्षक मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल दिनांक २३ ऑगस्ट, २०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.** महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनाथ - २०२२/प्र.क्र.१२२/का-०३,दिनांक ०६ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार उपरोक्त दोन्ही संवर्गांमधील अनाथ प्रवर्गाचा निकाल दिनांक २३ ऑगस्ट, २०२३ रोजी सुधारित करण्यात आला आहे. प्रस्तुत संवर्गांकरीता पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावाची सुधारित यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**३.** उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी मुख्य परीक्षेसाठी विहित कालावधीत अर्ज करणाऱ्या तसेच परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल.

**४.** आवश्यक तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल आरक्षणाच्या/समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**६.** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने आवश्यक माहिती तसेच परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पद्धतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्वीकारार्ह ठरतील.

उप सचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई